भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त १०० क्षमतेचे मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, बुलढाणा, येथील नवीन आर.सी.सी. इमारतीचे वसतीगृह बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक: बीसीएच-२०१८/प्र.क्र.२८०/ बांधकामे
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २५ फेब्रुवारी,२०१९.

वाचा :-

१) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. सान्यावि-२०१५/प्र.क्र.१६३/ बांधकामे, दि. ९/१०/२०१५

२) शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. सान्यावि-२०१५/प्र.क्र.४११/ बांधकामे, दि. १६/१२/२०१५

३) आयुक्त, समाजकल्याण पुणे यांचे पत्र जा. क्र. सकआ/शिक्षण/बांधकाम/मुलींचे शावगृह, बुलढाणा/नाव.अंदा.प्रमा./ २०१८-१९/२८०९, दि. ३०/७/२०१८ चे पत्र .

प्रस्तावना :-

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्ताने राज्यामध्ये मागासवर्गीय मुलींना शिक्षण घेणे सोयीचे व्हावे, म्हणून मुलींसाठी विभागीय स्तरावर ७ आणि जिल्हा आणि तालुका स्तरावर ४३ अशी एकूण ५० ठिकाणी मागासवर्गीय मुलींसाठी नवीन शासकीय वसतिगृहे सुरू करण्यास संदर्भ क्र. २ येथील दि. १६/१२/२०१५ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन मान्यतेच्या अनुषंगाने संदर्भ क्र. ३ येथील दि. ३०/७/२०१८ च्या पत्रान्वये आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त १०० क्षमतेचे मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, बुलढाणा या नवीन आर.सी.सी. इमारतीचे बांधकामासाठी रू.८,१७,१०,०००/- (अक्षरी रूपये आठ कोटी सतरा लक्ष दहा हजार फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

आयुक्त समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीवर्षानिमित्त १०० क्षमतेचे मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, बुलढाणा या वसतिगृहाच्या नवीन आर.सी.सी. इमारतीच्या बांधकामाच्या रू.८,१७,१०,०००/- (अक्षरी रूपये आठ कोटी सतरा लक्ष दहा हजार फक्त) इतक्या रकमेचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेकरीता शासनाकडे पाठविले आहे. सदर अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तांत्रिक बाबींची तपासणी करीता पाठविण्यात आले असता, सार्वजनिक बांधकाम विभागाने परिगणीत केल्यानुसार रू.८,१७,९०,६९७/- (अक्षरी रूपये आठ

कोटी सतरा लक्ष नव्वद हजार सहाशे सत्यान्नव फक्त) इतक्या अंदाजित खर्चाच्या कामास पुढील अटींच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

अ) काम सुरू करण्यापूर्वी नमुना नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच सुरू करावे

ब) ढोबळ स्वरूपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करून काम हाती घ्यावे.

क) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/तां.क.१. दि. १० जानेवारी,२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

ड) सदर कामाच्या बांधकामाचा खर्च सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या नियतव्ययामधून करण्यात यावा.

इ) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्रमांक बीडीजी २०१७/ प्र.क्र.६०/इमारती-२, दि.७/७/२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

ई) सदर अंदाजपत्रक अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, बुलढाणा यांचे साक्षांकन आवश्यक आहे. तसेच प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, अमरावती यांनी साक्षांकन करावे.

उ) नियोजित जागा उपभोक्ता विभागाच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करून सदर कामाच्या निविदा सूचना प्रसिध्द करण्यात याव्यात.

२. सदर मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह इमारत बांधकामाच्या सविस्तर अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता प्राप्त करून, विहित नियमानुसार अटी व शर्ती निश्चित करून ई-निविदा प्रसिध्द करण्याची कार्यवाही कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलढाणा यांनी तात्काळ करावी. ई-निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, ई-निविदा प्रक्रियेची सर्व कागदपत्रे सामाजिक न्याय विभागाकडे (उपभोक्ता विभाग) दायित्व मंजूरीसाठी पाठविण्यात यावे. सामाजिक न्याय विभागाची अंतिम मान्यता झाल्यानंतरच बांधकामाबाबतची पुढील कार्यवाही करण्यात यावी.

३. सार्वजनिक बांधकाम विभागाने छाननीअंती Recapitulation Sheet प्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेल्या रू.८,१७,९०,६९७/- (अक्षरी रूपये आठ कोटी सतरा लक्ष नव्वद हजार सहाशे सत्यान्नव फक्त) इतकी रक्कम परिगणीत करण्यात आली असून Recapitulation Sheet पुढीलप्रमाणे आहे.

Name of the Department : SOCIAL JUSTICE DEPTT.			
Name of Work : Construction of Government Hostel of Backward Girls Boys students (Capacity-100 Students) at Buldhana			
RECAPITULATION SHEET			
Sr. No.	**Particulars of Items**	**Norms (Unit Rate Rs. per Sqmt./Meter/LumpSum etc.)**	**Cost Rs.**
(A)	ESSENTIAL ITEMS		
1	**Building Proper (Scope)** 1917.052 Sq.mt including water proofing 481.96 sq.mt (d) **Cost of Construction**	22468.35 per sqmt. 1560	4,30,73,006 7,51,858 **4,38,24,864**
2	**Electrification** Internal External	5% of 1 (d) 6% of 1 (d) **Total**	21,91,243 26,29,492 **48,20,735**
3	**Water Supply and Sanitation**	5% - of 1 (d)	**21,91,243**
4	**Miscellaneous Items**		
	Green Building		43,82,487
	Internal Roads		20,00,000
	Furniture		50,00,000
	Plinth Protection 100	1500 Per Rmt.	1,50,000
	Parking Arrangements	Lump Sum	5,00,000
	Rain Water harvesting and plantation	Lump Sum	5,00,000
	Fire Fighting Arrangements	Lump sum	5,00,000
	solar Street light	Lump sum	5,00,000
	Garden and Flag post	Lump sum	6,00,000
		Total	**1,41,32,487**
	Sub Total (A) = (1)+(2)+(3)+(4)		**6,49,69,329**
(B)	**OPTIONAL ITEMS**		
Sr.	water Main, Storage and pump house,	Lump sum	46,01,611
	Bore Well		5,00,000
	solar Energy System		10,00,000
	subtotal (B)		**61,01,611**
	PROJECT (A) + (B) (T)		**7,10,70,940**
	Add 4% for Contingencies on (d)		**17,52,995**
	Add 12% for GST on (T)		**85,28,513**
	Add 1% for Insurance on (T)		**4,38,249**
	TOTAL COST OF PROJECT		**8,17,90,697**
	Say Rs. Lakhs		**817.90**

४. यावर होणारा खर्च मागणी क्र.एन-३, मुख्य लेखाशिर्ष २२२५- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्ग यांचे कल्याण, ७८९- अनुसूचित जाती घटक योजना, ०२ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती साजरी करणे, (योजनांतर्गत-दत्तमत) लेखाशिर्ष २२२५ डी८२३ या लेखाशिर्षाखाली खर्ची घालून तो सन २०१८-१९ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय तरतूदीमधून भागविण्यात यावा. सदर प्रकरणी आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक, आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. प्रस्तुतचा शासन निर्णय, दि.९/१०/२०१५ च्या शासन निर्णयान्वये गठित समितीस प्राप्त अधिकार तसेच वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उपविभाग-पाच, अनु.क्र.१ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परि.क्र.१३४ खाली प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१९०२२६१७३९५२६६२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a47356798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2019.02.26 17:44:07 +05'30'

(अनिल को.आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
२) उपसचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारती-२), मंत्रालय, मुंबई-३२.
३) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे.
४) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, बुलढाणा
५) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, बुलढाणा
६) महालेखापाल महाराष्ट्र १/२ (लेखापरीक्षा/लेखाअनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
७) प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग,अमरावती.
८) सहायक आयुक्त, समाजकल्याण, बुलढाणा.
९) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/बुलढाणा
१०) निवडनस्ती (बांधकामे)